महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ३० ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०६८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे



## विरार इमारत दुर्घटना
## १७ मृत्युमुखी - २६ जणांची सुटका

### ३६ तासांच्या बचावकार्याला पूर्णविराम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : विरारमध्ये मंगळवारी झालेल्या इमारत दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला असून नऊ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये सहा महिला आणि तीन मुलांचा समावेश आहे. बचाव पथकाने ढिगाऱ्याखालून अडकलेल्या २६ जणांची सुटका केली. गुरुवारी दुपारी ३६ तासानंतर शोधमोहीम थांबविण्यात आली.

मंगळवारी, २६ ऑगस्टला रात्री पावणेबाराच्या सुमारास नारिंगी येथील विजयनगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट कोसळली. ढिगाऱ्यात अनेक कुटुंबे गाडली गेली होती. याबाबत माहिती मिळताच महापालिकेचा अग्निशमन विभाग तसेच राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाच्या दोन तुकड्यांनी युद्धपातळीवर बचाव कार्य सुरू केले होते.


मात्र या परिसरात रस्ते अरुंद असून, चाळी आणि इमारती खेटून उभ्या आहेत. मोकळ्या जागांच्या अभावामुळे अग्निशमन दलाच्या गाड्या, रुग्णवाहिका आणि इतर मोठी वाहने पोहोचण्यास अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे बचाव कार्यात अडथळे येत होते. अखेर ३६ तासांच्या अथक प्रयत्नानंतर ढिगाऱ्याखाली रहिवाशांना बाहेर काढण्यात आले. बुधवारी सायंकाळपर्यंत १५ जणांना बाहेर काढण्यात आल्यानंतर रात्रीही शोधमोहीम सुरू होती.

गुरुवारी दुपारपर्यंत आणखी ११ जणांची सुटका करण्यात पथकांना यश आले. या दुर्घटनेत आरोही जोविल (२४), उत्कर्षा जोविल (१), लक्ष्मण किसकू सिंग (२६), दिनेश सकपाळ (४३), सुप्रिया निवळकर (३८), पार्वती सकपाळ (६०), दीपेश सोनी (४१), सचिन नेवाळकर (४०), अर्णव नेवाळकर (११), हरीश सिंग बिष्ट (३४), सोनाली तेजाम (४१), कशिश पवन सहेनी (१७), शुभांगी पवन सहेनी (४०), गोविंदसिंग रावत (२८), दीपकसिंग बोहरा (२५), ओंकार जोविल (२६), रोहिणी चव्हाण (३५) यांचा मृत्यू झाला असून संजय सिंग (२४), मिताली परमार (२८), प्रदीप कदम (४०), जयश्री कदम (३३), विशाखा जोविल (२४), मंथन शिंदे (१९), प्रभाकर शिंदे (५७), प्रमिला शिंदे (५०), प्रेरणा शिंदे (२०) या नऊ जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# जरांगेच्या आंदोलनाला एका दिवसाची मुदतवाढ




### विरोधकांचे तोंड भाजेल - मुख्यमंत्री



काही लोक जाणीवपूर्वक आंदोलन भडकविण्याचा प्रयत्न करत आहेत. ओबीसी आणि मराठा यांच्यात भांडण कसे लागेल? असा प्रयत्न केला जात आहे. सकाळपासून काही लोकांची विधाने मी ऐकली. त्यांचे प्रयत्न आमच्या लक्षात येत आहेत. आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका, तुमचे तोंड भाजेल. सोयीची भूमिका घेऊ नका. ठाम भूमिका घ्या. जे कायदेशीर आहे, ते होईलच. पण विरोधक ठाम भूमिका घेत नाहीत. कारण त्यांना समाजा समाजात भांडणे लावून राजकीय लाभ घ्यायचा आहे. आम्हाला मात्र कोणत्याही समाजाला नाराज करायचे नाही. आम्ही सर्व समाजाच्या इच्छा समजून घेत आहोत आणि त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत"

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला सुरुवात केली आहे. याआधी या आंदोलनासाठी आज संध्याकाळी 6 वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली होती, मात्र आता आणखी एका दिवसासाठी आंदोलनाला मुदतवाढ देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला सुरुवात केली आहे. याआधी या आंदोलनासाठी आज संध्याकाळी 6 वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली होती, मात्र आता आणखी एका दिवसासाठी आंदोलनाला मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आज रात्री मनोज जरांगे पाटील आणि मराठा आंदोलक हे आझाद मैदान परिसरात मुक्कामी असणार आहेत. पाटील यांनी आरक्षण मिळेपर्यंत मुंबई सोडणार नाही अशी भूमिका घेतली होती. त्याचबरोबर जरांगे पाटलांनी आंदोलनासाठी वाढीव मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता जरांगे पाटलांच्या आंदोलनाला एका दिवसाची मुदत वाढ देण्यात आली आहे. या काळात सरकारचे काही प्रतिनिधी जरांगे पाटलांची भेट घेणार असल्याचेही बोलले जात आहे.

## कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी करुन मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ओबीसी समाजाचे कोणतेही आरक्षण कमी करून मराठा समाजाला आरक्षण मिळावे अशी मराठा समाजाची देखील भूमिका नाही. मराठा समाजासाठी जे करता आले ते केले आहे. मराठा समाजासाठी जे योग्य, कायद्याच्या चौकटीत बसून देण्यासारखे आहे, ते देण्याची भूमिका आजही सरकारची आहे. भविष्यात सरकारला ज्या सूचना केल्या जातील. त्या सूचना लक्षात घेतल्या जातील. योग्य, कायदेशीर, नियमात बसणारी मागणी असेल तर याबाबत सरकार सकारात्मक आहे असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी ठाण्यात पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी शिंदे बोलत होते. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणार असे जाहीर केले होते. त्यावेळी मी मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. आजही मराठा समाजाला १० टक्के आरक्षणाचा लाभ मिळत आहे. कुणबी नोंदणी शोधण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांची समिती गठीत केली होती. ही समिती आज देखील काम करत आहे. लाखो कुणबी नोंदी सापडल्या. 'सारथी'च्या माध्यमातून विविध उपक्रम सुरु केले. त्याचा देखील मराठा समाजाला लाभ मिळत आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो तरुणांना रोजगारासाठी बिनव्याजी कर्ज मिळते आहे असे शिंदे यांनी स्पष्ट केले. मराठा समाजासाठी जे योग्य, कायद्याच्या चौकटीत बसून देण्यासारखे आहे, ते देण्याची भूमिका आजही आहे. मराठा समाज आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात मागासलेला असल्यानेच हे आरक्षण देण्यात आले होते.

भविष्यात सरकारला ज्या सूचना केल्या जातील. त्या सूचना लक्षात घेतल्या जातील. योग्य, कायदेशीर, नियमात बसणारी मागणी असेल. याबाबत सरकार सकारात्मक आहे. असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.



## ठाणेकरांच्या मेट्रो स्वप्नपूर्तीला वेग

### डोंगरीपाडा - गायमुख मार्गिकेचा विद्युत प्रवाह आज कार्यान्वित होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वडाळा - ठाणे कासारवडवली गायमुख मेट्रो ४ आणि ४ अ मार्गिकतील कॅडबरी जंक्शन - गायमुख दरम्यानच्या १०.५ किमीचा टप्पा डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) नियोजन आहे. त्यानुसार सप्टेंबरमध्ये कॅडबरी जंक्शन गायमूख टप्प्यातील मेट्रो गाड्यांच्या चाचणीला सुरुवात करण्यात येणार आहे. यासाठी वेगात तयारी सुरू असून आता शनिवारी (३० ऑगस्ट) १०.५ किमी मार्गिकतील डोंगरीपाडा मेट्रो स्थानक गायमुख मेट्रो स्थानकांदरम्यानच्या ४.६३८ किमीच्या मार्गिकवरील विद्युत प्रवाह कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, ओव्हरहेड लाईनच्या जवळ जाऊ नये यासंबंधीची सार्वजनिक अधिसूचना एमएमआरडीएकडून जारी करण्यात आली आहे. चाचणी सुरू झाल्यास ठाण्यातून पहिल्यांदाच मेट्रो धावताना दिसणार आहे.

एमएमआरडीएने वडाळा कासारवडवली दरम्यानच्या ३२.३२ किमी लांबीच्या आणि कासारवडवली - गायमुख दरम्यानच्या २.७ किमी लांबीच्या मेट्रो ४, ४ अ मार्गिकांचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकतील कॅडबरी जंक्शन - गायमुखदरम्यानच्या १०.५ किमी लांबीचा टप्पा डिसेंबर अखेरीस वाहतूक सेवेत दाखल करून ठाणेकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न पूर्ण केले जाणार आहे. हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्यासाठी स्थानकांच्या आणि इतर कामांना एमएमआरडीएने वेग दिला आहे. दुसरीकडे मेट्रो मार्गिकच्या संचलनासाठीच्या अत्यंत महत्त्वाचा आणि पहिला टप्पा सप्टेंबरमध्ये सुरू करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. या महत्त्वाच्या टप्प्यात मेट्रो गाड्यांची चाचणी करण्यात येणार आहे. मेट्रो गाड्यांच्या चाचण्यांना सुरुवात करण्यासाठी एमएमआरडीएने आनंद नगर जंक्शन येथे मेट्रो गाड्यांचे सहा डबे नुकतेच यशस्वीरित्या उन्नत रुळांवर चढविले आहेत.

हे डबे कासारवडवली स्थानकांपर्यंत नेण्यात आले आहेत. आता या डब्यांची जोडणी करून गाडी चाचणीसाठी सज्ज केली जाणार आहे. ही चाचणी सप्टेंबरमध्ये सुरू करण्याच्यादृष्टीने एमएमआरडीएने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कॅडबरी जंक्शन - गायमूख या टप्प्यातील डोंगरीपाडा मेट्रो स्थानक गायमूख मेट्रो स्थानक टप्प्यातील विद्युत प्रवाह शनिवारी कार्यान्वित करण्यात येणार आहे.




## ठाणे एसीबीच्या अपर पोलीस अधिक्षकपदी भागवत सोनवणे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) अपर पोलीस अधीक्षकपदी भागवत सोनवणे यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्यांनी संजय गोविलकर यांच्याकडून या पदाची सूत्रे हाती घेतली. राज्याच्या पोलीस दलात विविध महत्त्वाच्या पदांवर भागवत सोनवणे कार्यरत होते.

त्यांच्याकडे गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारविरोधी प्रकरणांचा तपास करण्याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात पोलीस उप अधीक्षक पदावर धडाडीने काम केले आहे. तसेच साहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नागपूर शहर, मुंबई शहर, नाशिक शहर, राज्यातील ग्रामीण भागातही उत्कृष्ट सेवा बजावली आहे.



## रक्ताभिसरण सुधारण्यासाठी बीटाची भाजी



बीटरूटच्या या भाजीचे सेवन केल्याने शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढते, तर रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि ताजेपणा राखण्यास मदत करते. संशोधनानुसार, बीटरूट आरोग्यासाठी फायदेशीर आहे. बीटरूटमध्ये बेटानिन, नायट्रेट, पॉलीफेनॉल, फायबर, व्हिटॅमिन सी आणि ई यासह अनेक विशेष घटक असतात. बीटानिन, जे त्याला लाल रंग देते, एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे. ते शरीरात उपस्थित असलेल्या हानिकारक मुक्त रॅडिकल्सना काढून टाकण्यास मदत करते. हे पेशींचे संरक्षण करते. याशिवाय, बीटरूटमध्ये असलेले नैसर्गिक घटक शरीरातील जळजळ कमी करतात आणि संधिवात सारख्या आजारांमध्ये आराम देतात.या मध्ये असलेले नायट्रेट्स शरीरात प्रवेश करतात आणि नायट्रिक ऑक्साईडमध्ये बदलतात, जे रक्तवाहिन्या पसरवतात आणि रक्तदाब नियंत्रित करतात. ते शरीरात रक्ताचे प्रमाण वाढविण्यास मदत करते. याशिवाय, ते रक्ताभिसरण सुधारून हृदयाचे आरोग्य राखते आणि थकवा दूर करण्यास मदत करते. हेच कारण आहे की अनेक खेळाडू आणि जिममध्ये जाणारे लोक त्यांच्या आहारात बीटरूटचा रस समाविष्ट करतात जेणेकरून त्यांना अधिक ऊर्जा आणि सहनशक्ती मिळते

# भिवंडीत बनावट कोल्ड्रिंक फॅक्टरीवर पोलिसांची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील महापोली परिसरात उत्तर प्रदेश पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने छापा टाकून बनावट 'वाम जिरा' कोल्ड्रिंक फॅक्टरीचा पर्दाफाश केला आहे.या छाप्यात पोलिसांनी बनावट कोल्ड्रिंकच्या 1.50 लाख बाटल्या, मशिनरी, बनावट लेबल आणि इतर साहित्य जप्त केले आहे. यासोबतच, पोलिसांनी फॅक्टरी सील केली असून,मालकावर कॉपीराइटसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे भिवंडी तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यात हनी जी फूडीज झोन प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी आहे, जी वाम जिरा नावाचे लोकप्रिय पेय उत्पादन करते.काही दुकानांमध्ये या उत्पादनांची नक्कल करून बनावट वाम जिरा विक्री केले जात होते.याबाबत कंपनी मालक अश्विनी जैन यांनी उत्तर प्रदेशातील बिजनौर जिल्ह्यात तक्रार दाखल केली होती.पोलिस तपासात ही बनावट उत्पादने महाराष्ट्रातील भिवंडीतील महापोली परिसरात शफाहत



लियाकत खान यांच्या जफरान एंटरप्रायझेस नावाच्या फॅक्टरीमध्ये तयार केली जात असल्याचे उघड झाले.कंपनीच्या तक्रारीवरून उत्तर प्रदेश पोलिसांनी भिवंडी पोलिसांच्या मदतीने महापोलीतील जफरान एंटरप्रायझेस या फॅक्टरी वर छापा टाकला.त्यावेळी फॅक्टरीमध्ये बनावट 'एम जिरा' कोल्ड्रिंकचे उत्पादन सुरू होते.पोलिसांनी तात्काळ हे उत्पादन थांबवले आणि दीड लाख हून अधिक बनावट बाटल्या,बनावट लेबल, कच्चा माल,मिक्सिंग आणि पॅकेजिंग मशीन जप्त केल्या. त्यानंतर पोलिसांनी संपूर्ण फॅक्टरी सील केली. या प्रकरणी, बेकायदेशीर फॅक्टरीचा मालक शफाहत लियाकत खान याच्या विरोधात कॉपीराइट कायदा 1957 आणि भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सध्या आरोपीचा शोध घेत आहेत.

# कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरासाठी सामंजस्य करार महत्त्वाचा ठरणार

**कोकण महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी कोंकण विभागीय आयुक्त कार्यालय व विजयभूमी विद्यापीठ यांच्यात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरासाठी सामंजस्य करार**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : प्रशासनाच्या डिजिटल परिवर्तनाकडे महत्त्वाचे पाऊल टाकत स्मार्ट गव्हर्नन्स व आदिवासी समाजाचे सशक्तीकरण या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरासाठी सामंजस्य करार महत्त्वाचा ठरणार असून, हा सामंजस्य करार आमच्या विभागासाठी डिजिटलदृष्ट्या सक्षम आदिवासी कल्याण प्रणाली घडविण्याच्या मिशनमधील नवा अध्याय असल्याचे मत कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

कोंकण विभागीय आयुक्त कार्यालय, नवी मुंबई आणि विजयभूमी विद्यापीठ, जामरूंग, ता. कर्जत जि. रायगड यांच्यात आज विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापरासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि विजयभूमी विद्यापीठाचे प्रो-चान्सलर व माजी महासंचालक डॉ. अश्विनी कुमार शर्मा, विजयभूमी स्कूल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी शाखेचे प्रमूख डॉ. सलूर श्रीकांत पटनाईक, यांनी स्वाक्षऱ्या केल्या. डॉ. पटनाईक हे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि बुद्धिमान प्रणाली या क्षेत्रातील अनेक दशकांचा संशोधन व विकासाचा अनुभव असलेले मान्यवर तज्ज्ञ आहेत. यावेळी अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) श्रीमती फरोग मुकादम, सह आयुक्त (करमणूक कर) रविंद्र पवार, सहायक संचालक लेखामेळ शाखा दिपक काटे, विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंपादक प्रविण डोंगरदिवे उपस्थित होते.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी म्हणाले की, हा सामंजस्य करार आमच्या विभागासाठी डिजिटलदृष्ट्या सक्षम आदिवासी कल्याण प्रणाली घडविण्याच्या मिशनमधील नवा अध्याय आहे. सेवांचे व्यवस्थापन, देखरेख आणि वितरण अधिक सुलभ व आधुनिक करण्यासाठी हा निर्णायक टप्पा आहे. विजयभूमी विद्यापीठासोबतची ही भागीदारी आम्हाला केवळ AI स्वीकारण्यास मदत करणार नाही, तर नागरिककेंद्रित व समतोल पद्धतीने, उद्देशपूर्ण आणि नैतिक रीतीने त्याचा वापर घडवून आणेल. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या प्रो-ऍक्टिव्ह, प्रेडिक्टिव्ह आणि पीपल-सेंट्रिक गव्हर्नन्स या दृष्टीकोनाशी आम्ही पूर्णपणे सुसंगत आहोत. या करारामुळे योजनांच्या अंमलबजावणीस गती मिळेल व वेळेचे काटेकोर पालन होईल. संसाधनांचे वितरण व गरजांचा अंदाज वर्तवण्यासाठी प्रेडिक्टिव्ह ॲनॅलिटिक्सचा वापर सुलभतेने करता येईल.

रिअल-टाइम मॉनिटरिंगसाठी AI-आधारित डॅशबोर्डचा उपयोग होईल. प्रादेशिक भाषांमध्ये नागरिकांसाठी डिजिटल अनुप्रयोग करता येतील. अधिकाऱ्यांना मदत करणारी AI आधारित निर्णय सहाय्य प्रणाली विकसीत होईल. प्रशिक्षण व कौशल्यविकासाद्वारे विभागाची डिजिटल क्षमता वाढेल. आदिवासी कल्याण योजनांचे रिअल-टाइम AI-आधारित मॉनिटरिंग करता येईल. सेवा वितरण वेळेत ३०–५०% घट होईल. आदिवासी भाषांमध्ये मोबाइल-आधारित डिजिटल सहाय्यक तयार करण्यात येतील.या भागीदारीतून आदिवासी कल्याण योजनांची अंमलबजावणी जलद व प्रभावी करण्यासाठी AI साधनांचा वापर होणार असून, संसाधनांचे नियोजन, रिअल-टाइम मॉनिटरिंग, प्रादेशिक भाषांतील डिजिटल सेवा, निर्णय सहाय्य प्रणाली व कर्मचाऱ्यांचे कौशल्यविकास यावर भर दिला जाणार आहे.

## उरलो फक्त असुरी शर्यतीला का रे ?



देवा !
कसली ही असुरी -अघोरी,अमुची शर्यत रे ।।
चाबूक-पराण्या मारण्या, धनी आसूसलेले रे ।।
हेच् का बैलपोळा-वसुबारस, साजरा करणारे रे ।।
बेफाम अम्हा हाकूनी,का आणिती मुखी फेस रे ।।
मूठभर शौकीनी राजकारणापायी,
का गोमाता पुत्रां वेठीस रे ।।
वर्षोन-हरदिनी जुंपूनी शेतात आदी,
अम्ही राबतोच ना रे ।।
मग काहून अघोरी वेदना, या शर्यत नामे देतात रे ।।
शल्य मनी ! शर्यत परवानगीपायी,
आमच्यावरी अ ' न्याय ' का रे ।।
देवा !
नशिबाने अमुची थट्टा केली रे ।।
दुरुनी ट्रॅक्टर उपहासे हसतोय रे ।।
उरलो फक्त असुरी शर्यतीला का रे ?
न्यायालयेही का न जाणीती अमुच्या वेदना रे ।।

– किरण प्र.चौधरी, दहिसर, मुंबई


# आदिवासी मुलांना शालेय साहित्य वाटप करून गणेशोत्सवाची सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'मानवसेवा हिच ईश्वर सेवा मानून, या गणेशोत्सवात काहीतरी वेगळं करण्याच्या हेतूने पत्रकार संजय कांबळे यांनी आदिवासी वाड्या पाड्यातील मुलांना आजच्या दिवशी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याची संकल्पना अँड, भरत काळूराम भोईर(पाटील) यांना सांगितली,तात्काळ त्यांनी याला होकार देऊन कै अश्विन शरद भोईर(पाटील) यांच्या स्मरणार्थ तालुक्यातील कोनावाडी या आदिवासी वस्तीत जाऊन, शैक्षणिक साहित्याचे वाटप केले, त्यामुळे त्यांनी हा एक वेगळा आदर्श गणेशमंडळापुढे ठेवला आहे. कल्याण तालुक्यातील म्हसकळ ग्रामपंचायत



हद्दीत कोनावाडी ही आदिवासी वस्ती असलेले छोटे गाव,२५/३०घरांच्या या वस्तीत स्वातंत्र्यानंतरही शिक्षणाची गंगोत्री अद्याप आलेली नाही, वस्तीत३०/४० मुले असतानाही येथे ना अंगणवाडी, ना झेडपीची शाळा?दहिवली चे युवा संस्कार बहुउदेशीय संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ राऊत हे जमेल तसे येथे जाऊन या शासकीय सोईसुविधे पासून कोसो दूर असलेल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे समाजसेवेची आवड , आणि सामाजिक जाणीव असणारे पत्रकार संजय कांबळे यांनी या मुलांसाठी काहीतरी करण्याचा निर्णय घेतला. आज संपूर्ण महाराष्ट्रात गणरायाचे आगमन होत आहे, मिरवणुका, देखावे, आणि इतर गोष्टींवर हजारो, लाखोंचा खर्च केला जातो, याला बगल देऊन काहीतरी वेगळं करण्याचा हेतू त्यांनी वरप गावचे नामांकित वकील अँड भरत भोईर यांना बोलून दाखवला, त्यांनी तात्काळ याला सहमत दर्शवून कै अश्विन शरद भोईर(पाटील) याच्या स्मरणार्थ या मुलांना शालेय बँग, खाऊ, कपडे, आदी वस्तूंचे वाटप केले, यावेळी या आदिवासी विद्यार्थ्यांनी नैसर्गिकरित्या बनवलेला बुके देऊन पत्रकारांसह,वकील, त्यांच्या कन्या साक्षी भोईर, आरुषी भोईर यांचे स्वागत केले. शिवाय कै अश्विन भोईर याला श्रध्दांजली देखील वाहण्यात आली. याप्रसंगी सगळें भावूक झाले होते.येथील सोईसुविधा ची वाणवा सोमनाथ राऊत यांनी बोलून दाखविली, तसेच असे आदर्श सर्व गणेश मंडळानी घ्यायला हवे असे मतही त्यांनी व्यक्त केले. यावेळी नारायण मुकणे, संजय मुकणे, कृष्णा आध्रे, यशवंत वाघ, पप्पू मुकणे, सौ शुभांगी राऊत, देऊ राऊत, पत्रकार संजय कांबळे, अँड, भरत भोईर(पाटील,)कु हिमांशू कांबळे, कु साक्षी भोईर, कु आरुषी भोईर आदी मंडळी उपस्थित होते.



# खाजगी प्राथमिक शिक्षकांचे पगार रखडले

## वेतन पथकात कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : मागील दोन-चार महिन्यापासून रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शाळांचे शिक्षकांचे पगार एक एक महिना उशीर होत असल्याने सर्व शिक्षक बांधवांमध्ये नाराजीचा सूर निर्माण झाला आहे. शासनाच्या शिक्षण विभागाकडून रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळांसाठी वेतन व भविष्य निर्वाह निधीची कामे पूर्ण करण्यासाठी असलेल्या वेतन पथकात फक्त एकच कर्मचारी काम करीत असल्याने शाळांची कामे वेळेवर होत नाहीत. शिक्षण उपसंचालक यांच्याकडे संघटनेने मागणी करून सुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली जात नसल्याने शाळांनी संताप व्यक्त केला आहे.

रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळा एकूण ६७ आहेत. यामध्ये तब्बल ५०० पर्यंत शिक्षक, शिक्षकेतर, मुख्याध्यापक, कर्मचारी कार्यरत आहेत .यांच्या पगाराची बिले, भविष्य निर्वाह निधीच्या स्लिप तसेच विविध अन्य शिक्षकांच्या पगारासंबंधीची कामे पूर्ण केली जातात. मे महिन्यामध्ये शिक्षणाधिकारी आणि वेतन अधीक्षक यांची बदली झाल्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व खाजगी प्राथमिक शाळांच्या शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत . परंतु प्राथमिक शाळांसाठी असलेल्या वेतन पथकात फक्त एकच कर्मचारी उपलब्ध असल्याने त्यांच्यावर पूर्ण कार्यालयाचा भार आलेला आहे. या कार्यालयात पूर्वी अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, दोन सहाय्यक लिपिकाची पदे मंजूर आहेत. शासनाने पूर्वी ही पदे भरलेली होती .परंतु सद्यस्थितीमध्ये एकच कर्मचारी कामाचा डोंगर खांद्यावर घेऊन शिक्षकांची शाळांची कामे पूर्ण करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे .याबाबत रायगड जिल्हा खाजागी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने विभागीय सहाय्यक शिक्षण उपसंचालक सुनील सावंत यांची भेट घेऊन वेतन पथकामध्ये ज्यादा कर्मचारी देण्याची मागणी केली होती. परंतु अद्याप पर्यंत कर्मचाऱ्यांचा खडखडाट झाल्याने शाळांची सर्वच कामे विलंबाने होत आहेत. तीन वर्षाच्या भविष्य निर्वाह निधीच्या स्लिपा अद्याप पर्यंत मिळालेल्या नाहीत. वेतन पथकाला कायमस्वरूपी अधीक्षक उपलब्ध होत नाहीत. जून महिन्याचा पगार २८ जुलैला झाला तर जुलै महिन्याचा पगार २६ ऑगस्ट रोजी झाला. ऑगस्ट महिन्याचा पगार हा गणपतीच्या सुट्टीच्या अगोदर होणे आवश्यक होता. मात्र गणपतीची सुट्टी आता संपत आली. त्यामुळे ऑगस्ट महिन्याचा पगार हा सप्टेंबर मध्ये कधी होईल याची शाश्वती नसल्याची नाराजी शिक्षक बांधवांनी व्यक्त केली आहे.अनेक बांधवांनी घर खरेदी , गाड्या खरेदी केले आहेत. त्यांचे हप्ते वेळेवर जात नाहीत .त्याचबरोबर मुलांच्या शिक्षणासाठी फी द्यावी लागत आहे. मात्र पगारच वेळेवर होत नसल्यामुळे अनेक शिक्षक बांधवांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. कर्जाचे हप्ते नियमित न केल्याने चक्रवाढ व्याजाचा दंडाचा दणकाही कर्मचाऱ्यांना बसत आहे. या कामी शिक्षण उपसंचालक यांनी तात्काळ वेतन खात्यामधील कर्मचाऱ्यांची कमतरता दूर करावी आणि कायमस्वरूपी वेतन खात्यामध्ये कर्मचारी द्यावेत अशी मागणीही आता शिक्षकांनी केली आहे. रायगड जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी विशेष लक्ष देऊन वेतन खात्यातील त्रुटी दूर कराव्यात आणि शिक्षक बांधवांचा पगार एक तारखेला कसा होईल यासाठी लक्ष द्यावे अशी मागणी रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शाळा संघटनेनी केली आहे.

> **शासनाने वर्ग दोनचे अधिकारीची ६०० पद आहेत .यापैकी फक्त १०० पदे शासनाने भरलेली आहेत. अनेक ठिकाणी रिक्त पदांमध्ये कर्मचारी भरली नसल्याने कर्मचाऱ्यांच्या कमतरतेची स्थिती निर्माण होत आहे. शासनाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन पदे भरली पाहिजेत. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये गटशिक्षणाधिकारी ही नेमलेले नाहीत. त्याचाही कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे. त्यामुळे पदांची कमतरता ही सर्वच बाबतीमध्ये आहे .लवकरात लवकर एका लिपिकाची नियुक्ती निश्चितच खाजगी प्राथमिक वेतन पथकामध्ये केली जाईल असे सांगितले.**
> –शिक्षण सहाय्यक उपसंचालक
> सुनील सावंत






## रेसिपी

## उपवासाचे मेदूवडे



साहित्य : साबुदाणा-1 कप उकडलेले बटाटे-2 मध्यम आकाराचे भाजलेल्या शेंगदाण्यांचा कूट-1/2 कप हिरव्या मिरच्या -2-3(बारीक चिरलेल्या) आलं- 1/2 इंच (किसलेले किंवा पेस्ट) जिरे-1/2 चमचा मीठ-चवीनुसार सैंधव मीठ कोथिंबीर-बारीक चिरलेली तेल-तळण्यासाठी गरजेनुसार

कृती : १) सगळ्यात आधी साबुदाणा स्वच्छ धुवून घ्या मग भिजत घाला. एका भांड्यात घेऊन त्यात साबुदाणा बुडेल इतकेच पाणी घालून 4-5 तास किंवा रात्रभर भिजत ठेवा. यामुळे साबुदाणा छान फुलून मऊ होईल. २) भिजवलेला साबुदाणा एका मोठ्या भांड्यात घ्या.त्यात उकडलेले बटाटे किसून किंवा हाताने कुस्करून घाला.आता त्यात भाजलेल्या शेंगदाण्याचा कूट, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, किसलेले आले, जिरं, सैंधव मीठ आणि कोथिंबीर घाला. ३) हे सर्व साहित्य हाताने चांगले मिक्स करून त्याचा गोळा तयार करा. पाण्याचा वापर करू नका. बटाट्याच्या ओलसरपणामुळे मिश्रण सहज एकत्र करता येतं. ४) हाताला थोडे तेल किंवा पाणी लावून मिश्रणाचा छोटा गोळा घ्या. त्याला मेदू वड्याचा आकार द्या. वड्याला मध्यभागी बोटाने छोटं छिद्र करा. यामुळे वडा आतूनही व्यवस्थित तळला जातो.अशा प्रकारे सर्व वडे तयार करून एका ताटात ठेवा. ५) कढईमध्ये तेल मध्यम आचेवर गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात 3-4 वडे एका वेळी सोडा. वडे दोन्ही बाजूंनी सोनेरी होईपर्यंत तळा. तळलेले वडे टिश्यू पेपरवर काढून ठेवा, जेणेकरून अतिरिक्त तेल शोषले जाईल.

# केडीएमसीच्या वतीने ड्रेनेज लाईनची साफसफाई,मच्छर औषध फवारणी

## इंदिरानगर संघर्ष रहिवासी संघटनेच्या पाठपुराव्याला यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : टिटवाळा पूर्वेतील इंदिरानगर परिसरात मोठी लोकवस्ती वाढली असून वाढत्या लोकसंख्येला सोयीसुविधा पुरविण्यास महापालिका असमर्थ ठरत असून यामुळे इंदिरानगर स्मशानभुमी रस्ता विभागात अनेक चाळी मधील लोकांच्या घरात पावसामुळे गटार लाईन नसल्याने सांडपाणी शिरले होते. याठिकाणी सर्व गोरगरीब नागरिक याठिकाणी राहण्यास आहे. येथे गटार लाईनच्या अभावी नागरिकांच्या घरी पाणी शिरत असते. याबाबत इंदिरानगर संघर्ष रहिवासी



संघटनेने केडीएमसीकडे पाठपुरावा करून ड्रेनेज लाईन साफसफाई करण्याची तसेच रोगराई पसरू नये यासाठी औषध फवारणी करण्याची मागणी केली होती.त्यांच्या या मागणीला यश आले असून इंदिरानगर स्मशानभुमी रस्ता विभागात मध्य भागी असलेली ड्रेनेज लाईन साफसफाई करण्यात आली. तसेच अ प्रभाग क्षेत्र आरोग्य विभागाकडे पाठपुरावा करून मच्छर औषध फवारणी देखील करण्यात आली असल्याची माहिती इंदिरानगर संघर्ष रहिवासी संघटनेचे अध्यक्ष गणेश भाटे यांनी दिली.

### कल्याण-डोंबिवली-भिवंडी शहर जिल्ह्यातील

# रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांची पद नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकर भवन, दादर येथे कल्याण डोंबिवली भिवंडी शहर जिल्ह्यामधून गेल्या काही दिवसांपूर्वी अनेक महिला व पुरुषांनी रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश केला होता. या सर्व नव प्रेषितांचे रिपब्लिकन सेनेचे सभासद करून घेण्यात आले होते. या सर्व नव प्रेषितांना व जुन्या कार्यकर्त्यांना न डावलता सर्वांशी खेळीमेळीच्या वातावरणात प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करून समीक्षा बैठक घेण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थान ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष अलका जगताप यांनी भूषविले.



महासचिव अभिमान निकम यांच्या कार्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी रिपब्लिकन वाहतूक सेनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा रिप. सेना भिवंडी शहर जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब ओव्हाळ, सुशीला ओव्हाळ, कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष (पँथर) आनंद नवसागरे, कल्याण शहर अध्यक्ष दामू काऊतकर, निमंत्रक ललिता आखाडे, रेखा गोडबोले, युवराज वाटूरे हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

रिपब्लिकन महिला सेना कल्याण डोंबिवली शहर जिल्ह्यात महासचिव वंदना गजबे, सचिव कल्पना मोटघरे, उपाध्यक्ष वंदना नाईकनवरे, गायत्री वासनिक, सहसचिव पौर्णिमा कांबळे, कार्य. सदस्य अनिता जगताप, लता शेंद्रे तर कल्याण शहरावर शहर उपाध्यक्ष मीरा काऊतकर, शहर संघटक छाया लांडे, उपसंघटक सखुबाई खंदारे, रंजना गोरे, तसेच भिवंडी शहर जिल्हा अध्यक्षपदी अपरीण खान, शहर उपाध्यक्ष कांचन शेवाळे, नीलू शेख यांची ठाणे प्रदेश जिल्हा उपाध्यक्षपदी पदोन्नती करण्यात आली.

रिपब्लिकन सेनेचे कल्याण डोंबिवली शहर उपाध्यक्ष विनोद रोकडे, कल्याण पूर्व अध्यक्ष बाबु तलाठी यांच्या सूचनेनुसार कल्याण पूर्व कमिटीवर सचिव सुरेश पंडित, उपाध्यक्ष रमेश पंडित, रमेश जाधव, रोहिदास खरे, भीमराव डेंगळे, संघटक प्रतिश सोनवणे, संतोष बागुल, विभाग सल्लागार पंडित जगताप यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत ढोणे तर सूत्रसंचालन आनंद नवसागरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीते करिता अभिमान निकम, संजय सोनकांबळे, गणेश ढोके, दीपक अहिरे, हनुमंत वाघमारे, गौतम देशपांडे, विकास आघाम यांनी प्रयत्न केले.




**मेष**

एखादा मित्र भेटायला घरी येऊ शकतो, ज्याला समोर पाहून तुमचा विश्वास बसणार नाही, वैयक्तिक समस्यांबद्दल मित्राशी बोलल्यानंतर हलके वाटेल.

**वृषभ**

दिवस अधिक नफा मिळविण्याचा आहे.वडिलांचे जीवन आणि कामाच्या ठिकाणी सहकार्य मिळेल. आज तुमच्या कौटुंबिक नात्यात गोडवा राहील.

**मिथुन**

व्यवसाय पुढे नेण्याची चांगली संधी आहे. स्पर्धेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची तयारी सुरूच राहणार आहे.व्यवसायाला पुढे नेण्यासाठी योजना कराल.

**कर्क**

त्वचेच्या समस्यांनी त्रस्त असलेले लोक आज चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्याल. व्यवसायातील भागीदारासोबत परदेशात जाण्याची शक्यता आहे.

**सिंह**

अभियंत्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे; चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.दिवस आनंदाने भरलेला असणार आहे.कुटुंबात प्रशंसा होईल.

**कन्या**

खेळाशी संबंधित लोक प्रशिक्षणात खूप मेहनत घेतील. कुरिअर व्यावसायिकांना फायदा होईल. विद्यार्थी प्रॅक्टिकल करण्यासाठी वरिष्ठांची मदत घेतील.

**तूळ**

तुमचे यश गगनाला भिडणार आहे. बालपणीचा मित्र भेटेल, जुन्या आठवणी ताज्या होतील.दिवसाची सुरुवात एखाद्या गरीब व्यक्तीला मदत करून कराल.

**वृश्चिक**

धार्मिक कार्यात श्रद्धा आणि विश्वासाने पुढे जाल. आज जर तुम्ही तुमच्या कामात घाई करणे टाळले तर भविष्यातील समस्यांपासून तुमचे रक्षण होईल.

**धनु**

जीवनात काही बदल होऊ शकतात जे तुमच्यासाठी चांगले सिद्ध होतील. आज तुम्हाला काही काम पूर्ण करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागेल.

**मकर**

कुटुंबात आनंद आणि समाधान वाढेल. आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले राहील.कामाचे कुटुंबात कौतुक होईल. दिवस महिलांसाठी खास असणार आहे.

**कुंभ**

घरात होणाऱ्या कोणत्याही धार्मिक विधीमुळे भक्तीचे वातावरण राहील. कौटुंबिक नात्यातील गैरसमज आज दूर होतील. कार्यक्रमात सहभागी व्हाल.

**मीन**

कुटुंबासोबत एखाद्या धार्मिक स्थळी दर्शनासाठी जाल, कौटुंबिक प्रेम वाढेल. आज शांत चित्ताने कोणतेही काम केल्यास ते लवकरच पूर्ण होईल.



# विरार इमारत दुर्घटनाग्रस्तांना म्हाडाची तात्पुरती घरे !

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** विरारमध्ये इमारत कोसळून १७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत हृदयद्रावक आहे. राज्याचे परिवहन मंत्री व पालघर जिल्हा संपर्कमंत्री प्रताप सरनाईक यांनी आज या दुर्घटनास्थळाला भेट दिली आणि पीडित कुटुंबांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. या कठीण काळात आम्ही सर्वजण, राज्य सरकार नागरिकांच्या सोबत उभे आहोत. शासन सर्वतोपरी सहकार्य करेल. विरारच्या या दुर्घटनेत ज्यांची घरे गेली आहेत त्यांच्या तात्पुरती राहण्याची सोय बोलींज म्हाडा प्रकल्प येथील घरांमध्ये करण्याबाबत मंत्री सरनाईक यांनी म्हाडाच्या उपाध्यक्षाना सूचना केल्या. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी सरनाईक यांनी फोनवरून सविस्तर चर्चा केली.

बोलींज म्हाडा प्रकल्पातील ६० घरे लगेच दुर्घटनाग्रस्त नागरिकांना तात्पुरत्या स्वरुपात राहण्यासाठी देण्याचा निर्णय सरनाईक यांनी घेतला. या रहिवाशांना उद्यापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात राहण्यासाठी म्हाडाची घरे दिली जातील, असे सरनाईक यांनी सांगितले.

प्रताप सरनाईक यांनी महापालिका मुख्यालयात याबाबत बैठक घेऊन एकनाथ शिंदि यांच्याशी चर्चा केल्यानंतर वसई विरारमधील धोकादायक, जुन्या इमारतींच्या विकासासाठी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना आणि SRA लागू केला जाईल, असेही उपमुख्य मंत्री शिंदे यांनी व मंत्री सरनाईक यांनी सांगितले. याबाबत पुढील आठवड्यात मंत्रालयात एकनाथ शिंदे हे बैठक घेणार आहेत, अशी माहिती सरनाईक यांनी दिली.

# डोंबिवली - कल्याण परिसरातून शाडूच्या पाच हजाराहून अधिक गणेशमूर्तींचे संकलन

गणेशोत्सवापूर्वी डोंबिवली महापालिका हद्दीत पर्यावरण स्नेही गणपती उत्सव साजरा करण्यासाठी पालिका प्रशासन, पर्यावरण प्रेमी संस्था यांनी खूप प्रयत्न केले. शाडूच्या मातीपासून गणपती तयार करण्याच्या कार्यशाळा घेतल्या. त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

● रोहिणी लोकरे, कार्यकारी अभियंता, पर्यावरण विभाग.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - गणेशोत्सवानिमित्त डोंबिवली व कल्याण परिसरात घेण्यात आलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत दीड दिवसांच्या विसर्जन केलेल्या एकूण ५२८८ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले आहे. या उपक्रमाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. डोंबिवलीतील बंदिस्त क्रीडागृहामध्ये मूर्ती संकलन केंद्र उभारण्यात आले होते. या ठिकाणी एकूण ३४६३ गणेशमूर्ती जमा झाल्या. गणेशोत्सवापूर्वी डोंबिवलीतील विविध शाळा, महाविद्यालये, मंदिरे आणि सामाजिक संस्थांमध्ये शाडू माती पासून गणपती मूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पर्यावरण दक्षता मंडळ आणि इतर पर्यावरण प्रेमी संस्थांनी या उपक्रमात भाग घेतला.

अत्रे मंदिर कडोमपा शाळा- ४००, विद्यार्थी बंदिस्त क्रीडागृह कडेमपा ४६५७, सहभागीगणेश मंदिर परिसर - २५ रीजन्सी इस्टेट, बिर्ला नाईट कॉलेज ३५, बिर्ला डे कॉलेज - ३०, शिवसेना शाखा - ४५ या ठिकाणी पर्यावरणपूरक गणेशोत्सव, शाडू मातीच्या मूर्तींचे विसर्जन आणि मूर्ती संकलन या विषयांवर कार्यशाळा घेऊन जनजागृती करण्यात आली. गुरुवारी दीड दिवसांच्या गणपती विसर्जनात कल्याण परिसरातूनह शाडूच्या १८२५ गणेशमूर्तींचे, डोंबिवली मधून ३४६३ गणेश मूर्तींचे संकलन करण्यात आले. अशा प्रकारे डोंबिवली व कल्याण परिसरातील एकत्रित ५२८८ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले आहे.

# रस्ते हस्तांतरीत झाल्यानंतरच विकास !

## - पनवेल महानगरपालिकेची ठाम भूमिका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** कामोठे येथील जवाहर सहकारी औद्योगिक वसाहतीतील रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न 'उद्योग सुसंवाद २०२५' बैठकीत चांगलाच गाजला. उद्योजकांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर तक्रार करताना, महापालिकेने तब्बल ६५ ते ८० कोटी रुपये कर वसूल करूनही मूलभूत सुविधा न पुरवल्याचे स्पष्ट केले. विशेषतः मुख्य रस्त्याची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी न झाल्यामुळे उद्योगांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, या संदर्भात पनवेल महानगरपालिकेने आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, संबंधित रस्ते सहकारी संस्थेच्या मालकीचे असल्याने ते महापालिकेकडे हस्तांतरीत झाल्यावरच दुरुस्ती व विकासाची जबाबदारी प्रशासन घेऊ शकेल. आयुक्त मंगेश चितळे यांनीही याच भूमिकेची पुनरावृत्ती करून, हस्तांतरण झाल्यास रस्त्यांची दर्जेदार पुनर्बांधणी तातडीने केली जाईल, असे आश्वासन दिले. यामुळे जोपर्यंत उद्योजक रस्ता हस्तांतरण करत नाही किंवा उद्योजकांची संस्था रस्ते पुनर्बांधणीला ना हरकत देत नाही तोपर्यंत येथील रस्ते पुनर्बांधणीचे काम सरकारच्या तांत्रिक अडचणीत अडकण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शनिवारच्या (२३ ऑगस्ट) जिल्हाधिका-यांसमोरच्या बैठकीत पनवेल महापालिकेचे उपायुक्त डॉ.

वैभव विधाते यांनी वारंवार संबंधित रस्ता उद्योजकांनी हस्तांतरण केला नसल्याने येथे काम करण्यात अडचण येत असल्याची पालिकेची बाजू मांडली. मात्र रायगड जिल्हाधिका-यांनी पनवेल महापालिकेच्या बाजूकडे कानाडोळा करून महापालिका प्रशासनाला रस्ते दुरुस्तीबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे तोंडी आदेश दिले. उद्योग सुसंवाद बैठकीत उद्योजकांनी मांडलेले गा-हाणे आणि त्यावर जिल्हाधिका-यांनी पनवेल महापालिकेची बाजू न एकता उलट पालिका प्रशासनाची केलेली कानउघडणी याबाबतचे सविस्तर वृत्त लोकसत्ताने प्रसिद्ध केल्यानंतर पनवेल महापालिकेने आयुक्त मंगेश चितळे यांना पुढाकार घेऊन याबाबतची महापालिकेची भूमिका स्पष्ट केली आहे. महापालिकेच्या म्हणण्यानुसार, उद्योजकांना फक्त रस्तेच नव्हे तर इतर अनेक सुविधा दिल्या जात आहेत. सध्या त्या औद्योगिक वसाहतीत घनकचरा व्यवस्थापनाची सोय केली गेली आहे.



# ठाणे मनपा हद्दीत दीड दिवसांच्या १९५६७ मूर्तींचे विसर्जन

## १५ टनाहून अधिक निर्माल्य जमा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२९) :** ठाणे महापालिका क्षेत्रातील दीड दिवसाच्या गणेश मूर्तींचे विसर्जन गुरूवारी भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. यावर्षी महापालिका क्षेत्रात दीड दिवसांच्या १९५६७ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. त्यापैकी ११६९५ मूर्ती पीओपीच्या होत्या. तर, ७७८१ मूर्ती शाडू मातीच्या होत्या. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवून राज्यात पर्यावरणभिमुख गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणाऱ्या ठाणे महापालिकेच्या पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्थेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश मूर्तींच्या विसर्जनाला भाविकांनी याही वर्षी चांगला प्रतिसाद दिला.

गतवर्षी कृत्रिम तलावात ८७०० मूर्तींचे विसर्जन झाले होते. यंदा ही संख्या वाढून १२९७० झाली आहे. तर, खाडी विसर्जन घाटावर गतवर्षी ६५२० मूर्तींचे विसर्जन झाले होते. ती संख्या यंदा ३३८२ एवढी आहे. तसेच, विशेष हौद (टाकी) व्यवस्थेत भाविकांनी गतवर्षी १६२१ मूर्तींचे विसर्जन केले होते.

ती संख्या यावर्षी २६१३ एवढी आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या गणेश मूर्ती स्वीकृत केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण ४९५ गणेश मूर्तींचे तसेच, फिरत्या विसर्जन व्यवस्थेतील १०७ गणेशमूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

कृत्रिम तलाव, फिरते विसर्जन पथक, हौद, स्वीकृती केंद्र येथील सर्व मूर्तींचे विधिवत विसर्जन झाल्यावर पाण्याच्या तळाशी जमणाऱ्या मातीच्या गाळावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार प्रक्रिया केली जात असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

१५ टनाहून अधिक निर्माल्य भक्तांनी केले दान

यावर्षी निर्माल्यापासून बायोकंपोस्टिंग पद्धतीने खत करण्यासाठी ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाच्या खत प्रकल्पात निर्माल्य जमा करण्यात आले. कोलशेत, कौसा, ऋतू पार्क येथे हे प्रकल्प कार्यान्वित आहेत. दीड दिवसाच्या गणेश मूर्ती विसर्जनादरम्यान सुमारे १५ टनाहून अधिक निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे. तसेच निर्माल्यांतील अविघटनशिल घटकांचे वर्गीकरण करून ते पुर्नप्रक्रियेसाठी पाठवण्यात येणार आहेत. प्लास्टीक, थर्मोकोल यांचे निर्माल्यातील प्रमाण गेल्यावर्षीपेक्षा कमी झाले आहे.

# कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीत भक्तीमय वातावरणात दीड दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन !



पालिकेच्या कृत्रिम तलावांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली परिक्षेत्रातील दीड दिवसांच्या श्री गणेश मुर्तीचे काल रात्रीच्या प्रहरी भरपावसातही अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि शांततेत विसर्जन करण्यात आले. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यापूर्वीच नागरिकांना, सार्वजनिक श्री गणेश मंडळांना, त्यांच्या 6 फुटापेक्षा कमी उंचीच्या श्री गणेश मुर्ती महापालिकेने उभारलेल्या कृत्रिम तलावात विसर्जित करणेबाबत केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी महापालिकेच्या कृत्रिम विसर्जन स्थळांना प्राधान्य देऊन आपापल्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जन कृत्रिम विसर्जन स्थळी केले.

महापालिका क्षेत्रात काल रात्री पर्यंत 5,385 शाडु मुर्तींचे आणि 9,582 पीओपी मुर्तीचे असे एकूण 14,967 श्री गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. यासाठी महापालिकेने सर्व प्रभागातील विसर्जन स्थळांवर कृत्रिम विसर्जनासाठी चोख व्यवस्था ठेवली होती. त्याचप्रमाणे महापालिकेच्या वैदयकिय आरोग्य विभागामार्फत सर्व प्रभागक्षेत्रनिहाय वैदयकीय पथकाची (डॉक्टर्स,स्टाफनर्स इ.) तसेच प्रमुख विसर्जन स्थळावर रुग्णवाहिकेची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली. अग्निशमन विभागामार्फत प्रमुख विसर्जन स्थळांवर बोट, तराफा, लाईफबॉय, लाईफजॅकेट, गोताखोर या सुविधा देण्यात आल्या.

महापालिकेच्या विदयुत विभागामार्फत 76 ठिकाणी जनरेटर, 2,475 हॅलोजन, 558 एलईडी, 105 लाईटनिंग टॉवर, 38 ठिकाणी 212 सी.सी.टिव्ही कॅमे-यांची व्यवस्था त्याप्रमाणे मंडपाची व्यवस्था करण्यात आली. तसेच विदयुत विभागामार्फत 20 विजर्सन स्थळावर अक्षय ऊर्जा जनजागृती कक्ष उभारण्यात आले , सदर कक्षात विदयुत विभागाच्या पथकामार्फत सौर ऊर्जा व ऊर्जा बचतीबाबतचा संदेश उपस्थित भाविकांपर्यंत, श्री गणेश भक्तांपर्यंत, नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

सर्व विसर्जन स्थळी विसर्जन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार दुर्गाडी, मोठा गाव, कुंभारखान पाडा या महत्त्वांच्या विसर्जन स्थळांवर 10 दिवसांच्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जन होईपर्यंत अधिकारी वर्गाच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. विसर्जन स्थळांवर घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत निर्माल्य कलश, डस्टबिन, साफसफाईसाठी मनुष्यबळ देण्यात आले होते. विसर्जन स्थळी निर्माण झालेले 18.5 टन निर्माल्य मा.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांचा खत प्रकल्प, गणेश मंदिर डोंबिवली येथील खत प्रकल्प तसेच महापालिका बायोगॅस प्रकल्प व खत प्रकल्प येथे पाठविण्यात आले.

महापालिकेने यावर्षी प्रथमच प्रभागनिहाय विसर्जन स्थळे गुगल मॅपव्दारा प्रदर्शित केल्यामुळे श्री गणेश भक्तांना विसर्जनासाठी जातांना होणारी अडचण आणि वाहतुक कोंडीमुळे होणारा ताण कमी झाला. महापालिकेने ठिकठिकाणी केलेल्या कृत्रिम विसर्जन स्थळांच्या व्यवस्थेबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# पालघर नगर परिषदेच्या प्रभाग रचनेवर आक्षेप नोंदवण्याचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर नगर परिषदेच्या प्रारूप प्रभाग रचनेचे काम अत्यंत गोपनीयतेने हाताळण्यात आले असून कोणत्याही राजकीय व्यक्ती, माध्यमे किंवा इतर व्यक्तींना याबद्दल माहिती देण्यात आलेली नाही. याबाबत केलेल्या तक्रारी चुकीच्या आणि निराधार असल्याचे पालघरचे मुख्याधिकारी नानासाहेब कामठे यांनी स्पष्ट केले आहे. तरी देखील प्रारूप प्रभाग रस्तेबाबत नागरिकाना हरकती असल्यास त्यांनी ३१ ऑगस्ट पर्यंत नोंदवण्याचे आवाहन पालघरचे मुख्याधिकारी नानासाहेब कामठे यांनी केले आहे.

पालघरच्या नगर परिषदेच्या प्रारूप प्रभाग रचनेचे कामकाजात दोष असल्यासंदर्भात तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीमध्ये उपस्थित केलेले मुद्दे चुकीचे असल्याचे व तथ्य नसल्याची भूमिका नगर परिषदेने घेतली आहे. मुख्याधिकाऱ्यांनी यावर खुलासा देत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार १२ जून २०२५ रोजी प्रभाग रचना समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीने जनगणनेच्या १५ प्रगणक गटांची माहिती तपासली, गुगल मॅपवर नकाशे तयार केले आणि प्रत्यक्ष जागेवर जाऊन सीमा तपासल्या, हा प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा २३ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला. एकूण ३० सदस्यांची संख्या गृहीत धरून १५ प्रभाग तयार करण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

# उल्हासनगर शासकीय बालसुधार गृहातून सहा मुली बेपत्ता ?




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर:** बालसुधार गृहातून 6 अल्पवयीन मुली पळून गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उल्हासनगरच्या शासकीय बाल सुधारगृहातून या मुली पळाल्या. सहा पैकी दोन मुलींचा शोध पोलिसांनी घेतला आहे. तर चार मुलींचा शोध पोलिस घेत आहेत. सापडलेल्या मुलींनी पोलिसांना जबाब दिला आहे की, आम्हाला त्या ठिकाणी राहायचे नाही. त्यामुळे आम्ही पळून गेलो. या मुली पळून गेल्याने बालसुधारगृहाच्या सुरक्षा यंत्रणेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

बुधवारी दुपारी दोन ते तीन वाजताच्या दरम्यान उल्हासनगर येथील शासकीय बालसुधार गृहातून सहा अल्पवयीन मुली अचानक बेपत्ता झाल्या. त्यानंतर माहिती समोर आली की, या मुलींनी मेन गेटची चावी कुठून तरी मिळवली. मेन गेट उघडून सहा मुलींनी तिथून पलायन केले. या प्रकरणात उल्हासनगर हिललाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी सहा मुली अचानक बेपत्ता झाल्याने याचा तपास सुरु केला आहे.

उल्हासनगरचे डीपीसी सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या मुलींना शोधण्यासाठी पथके नेमली गेली. दोन मुलींना शोधण्यात पोलिसांना यश आले. या दोन मुली त्यांच्या मिराभाईंदर येथील राहत्या घरी मिळून आल्या. याबाबत उल्हासनगरचे डीपीसी गोरे यांनी सांगितले की, या सहा पैकी काही मुली मिराभाईंदर, काही मुली ठाणे तर काही मुली मुंबईतील आहेत.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई,संचलित
जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी (दळखण)
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१(मुंबई विद्यापीठाशी संलग्न) ISO 9001 : 2005
विद्यार्थ्यांची स्वप्न अनेक पण स्वप्नपूर्तीचं केंद्र एक...
ADMISSION OPEN
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT)
UNDER GRADUATION: B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com, M.A. मराठी, M.A. अर्थशास्त्र, M.A. समाजशास्त्र, M.A. भूगोल
For More Details Email - jeevandeepkhardi@gmail.com
Website- www.jsspcollegekhardi.in
8669244522, 9167043099
9923992390, 9619188558

# सीएसएमटी स्थानकात मराठा आंदोलकांची गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी महाराष्ट्रभरातून हजारो कार्यकर्ते मुंबईत दाखल झाले आहेत. आंदोलकांन सीएसएमटी परिसर घोषणाबाजीने दणाणून सोडला होता. सीएसएमटी रेल्वे स्थानकातही आंदोलकांनी गर्दी केली होती. त्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय झाली होती. या गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात येत होती. मात्र, पोलिसांचे प्रयत्न व्यर्थ ठरत होते.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक आक्रमक झाले आहेत. आझाद मैदान, सीएसएमटी परिसर तसेच रेल्वे स्थानक आंदोलकांची प्रचंड गर्दी झाली होती. त्यातच रेल्वे स्थानकात आंदोलकांनी नाच गाणी करत धिंगाणा घातल्याने प्रवासी त्रस्त झाले होते. महिला प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. फलाटाच्या दुतर्फा आंदोलकांची गर्दी असल्याने चालणेही अवघड झाले आहे. महिलांच्या डब्यात घुसखोरी केलेल्या आंदोलकांनी बाहेर यावे यासाठी पोलीस उद्घोषणा करीत होते.

मुस्लिम मावळ्यांचा आंदोलनात सहभाग

मराठा आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रभरातून विविध सामाजिक कार्यकर्ते व मराठा समाज मुंबईत दाखल झाला आहे. मनोज जारांगे यांना पाठिंबा देण्यासाठी अनेक मुस्लिम बांधव देखील आंदोलनात सहभागी झाले होते. 'गणपती बाप्पा सरकारला बुद्धी दे, गरजवंत मराठ्यांच्या लढ्याला यश दे' अशा आशयाचे फलक हातात घेऊन मुस्लिम बांधव या आंदोलनात सहभागी झाले होते.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून पुन्हा एकदा मराठा आंदोलक आक्रमक झाला आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, त्यासाठी शुक्रवारी सकाळी मनोज जरांगे पाटील



आझाद मैदानात दाखल झाले. त्यांना पाठींबा देण्यासाठी लाखोंच्या संख्येने आंदोलक विविध मार्गान मुंबईत दाखल होत होते. तर, आझाद मैदान परिसरात, सीएसएमटीच्या स्थानकासमोरील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा हजारोंच्या संख्येने आंदोलक उभे होते. तसेच, छत्रपती शिवाजी टर्मिनस स्थानकात आंदोलक बसले होते. त्यामुळे अत्यावश्यक काम असेल तरच सीएसएमटीवरून प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांना करण्यात आले.

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील सीएसएमटी स्थानकावरून दररोज सुमारे ११ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे दिवसभर प्रवाशांची रहदारी असते. तसेच सध्या गणेशोत्सव सुरू असल्यामुळे मुंबईतील गणपतीचे दर्शन घेण्यासाठी देश-विदेशातून भाविक मुंबईत दाखल होत आहेत. परंतु, शुक्रवारी सीएसएमटी परिसरात आंदोलकांची गर्दी झाली होती. काही आंदोलक रस्त्यावरच ठिय्या देऊन बसले होते, तर काही चक्क झोपले होते. तर, काही आंदोलक जेवण करीत आहेत. एरवी कोणी प्रवासी जास्त वेळ बसल्यास त्याची पोलीस विचारपूस करतात.. तसेच, त्याला लवकरात लवकर तेथून जाण्यास सांगतात. आझाद मैदानात जाणाऱ्या आंदोलकांना जादा वेळ स्थानकात थांबू दिले जात नाही. परंतु, मराठा आंदोलक मात्र गुरुवारी सकाळपासून शुक्रवारी दुपारपर्यंत स्थानकातच होते. याबद्दल प्रवासी आश्चर्य व्यक्त करीत होते.

# मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी महावाणिज्य दूतांनी घेतले गणेश दर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी विविध देशातील महावाणिज्य दूतांनी गणेशाचे दर्शन घेत मनोभावे आरती केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती अमृता फडणवीस यांनी सर्व महावाणिज्य दूतांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांसोबत सुमारे ३५ महावाणिज्य दूतांनी सहकुटुंब आरतीत सहभाग घेतला. फ्रान्सचे जीन मारे सेरे चार्लेट, ब्रिटीश उच्चायुक्तालयाचे राजकीय प्रमुख जॉन निकेल, मलेशियाचे अहमद झुवारी युसूफ, साउथ कोरियाचे डॉंगवान यू, ब्राझिलचे जाओ दे मेंडोन्का लिमा नेतो, बांग्लादेशच्या श्रीमती फरहाना अहमद चौधरी, इंडोनेशियाचे इडी वॉरडोयो, यूएईचे अब्दुल्ला हुसेन अल्मारझुकी, अर्जेटिनाचे डॅनिअल क्यूर कन्फलोनिरी, श्रीलंकेचे प्रियंगा विक्रमसिंघे, इजिप्तचे दहिला तवाकोल, फिनलंडच्या इवा निल्सन, पोलंडचे थोमाझ, कतारचे अहमद साद अल सुलैती, मॉरिशसचे दुशांत बक्तोवार, इसराईलचे कोब्बी शोशनी, जपानचे कोजी यागी, युएसएचे मायकेल स्क्रेन्डर, टर्कीचे मुस्तफा केमालटीन युगूर, पनामाचे रॉबर्टो रॉड्रिग्ज प्रडा, इराकचे झुहायर साद अब्बास, कुवेतचे शाये अबू शायबा, ऑस्ट्रेलियाचे पौल मुर्फी, आयर्लंडचे टॉम नूनन, नेदरलँडचे नाबील तौती, बेलारूसचे अलिकसंदर मत्सूको, स्पेनचे जॉर्ज डी लुकास कॅडेनास, थायलंडच्या थितीपॉर्न चुचीन्नावट, स्वीडनचे उपमहावाणिज्य दूत जोकीम गुन्नारसन, स्विर्झलँडचे मॅथिअस कोएग्ल, सौदी अरेबियाचे सुलेमान ईद अलोतैबी, इटलीचे वॉल्टर फेरारा, मेक्सिकोच्या अड्रिना विल्लानेवा, चीनचे क्वीन जी, जर्मनीचे क्रिस्टोफ रेंडटॉर्फ, सिंगापूरचे जेरम वॉंग, बहरिनचे अली अब्दुल अझीज अल बलुशी यांच्यासह अफगाणिस्तानचे महावाणिज्य दूत यांनी सहकुटुंब आरतीत सहभाग घेतला.

गणेश दर्शन, आरतीनंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि श्रीमती अमृता फडणवीस यांनी सर्वांची वैयक्तिक विचारपूस करीत चर्चा केली.

# गणेशोत्सवात भिवंडीत अवजड वाहनांना बंदी

## पोलीस उपआयुक्तांकडून अधिसूचना जाहीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरात आणि परिसरात शांततेत तसेच उत्साहात गणेशोत्सव सुरु आहे.त्याचप्रमाणे दिड दिवसांपासून ते दहा दिवसांपर्यंत सार्वजनिक आणि खाजगी गणेशमूर्तींचे विसर्जन होत आहे. गणेशमुर्ती विसर्जनाच्या दिवशी मोठ्या संख्येने भाविक मार्गाने निघत असतात. नमूद कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत तसेच सुनिश्चित राहणे जनतेच्या सोईसाठी आणि गणेश भक्तांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक आहे.या करीता ठाणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपआयुक्त पंकज शिरसाट यांनी तारीख २७ ऑगस्ट २०२५ ते ०६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत भिवंडी शहरातून जाणाऱ्या अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आल्याची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

पोलीस उपआयुक्त शिरसाट यांनी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार नवी मुंबई कडुन मुंब्रा माणकोली मार्गे गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कळवा वाहतूक उप विभागाच्या हद्दीत गॅमन जंक्शन येथे 'प्रवेश बंद' करण्यात आला आहे. मुंबई कडुन माजीवाडा वाय जंक्शन माणकोली मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कापुरबावडी वाहतूक विभागाच्या हददीत व माजीवाडा वाय जंक्शन येथे 'प्रवेश बंद' करण्यात आला आहे. मुंबई व नवी मुंबई कडुन बाळकुम नाका,भिवंडी अंजुर फाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कापुरबावडी वाहतूक विभागाच्या हददीत बाळकुम नाका येथे 'प्रवेश बंद' करण्यात आला आहे. गुजरात कडून चिचोंटी नाका मार्गे भिवंडी नारपोली वाहतूक विभागाच्या हद्दीत अंजुर फाटा मार्गे नाशिक/मुंबई/नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना चिंचोटी नाका येथे 'प्रवेश बंद' करण्यात आला आहे. भिवंडी वाहतूक उप विभाग येथुन नारपोली वाहतूक उप विभाग हददीत अंजुर फाटा मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना कल्याण नाका येथे 'प्रवेश बंद' करण्यात आला आहे.

उत्सवाच्या काळात कोणतेही गालबोट लागू नये, या करीता ठाणे वाहतूक विभागाने हि खबरदारी घेतली आहे. असे असताना देखील भिवंडीच्या ग्रामीण भागातून महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावरून अवजड वाहने न पाठविता हि अवजड वाहने शहरातील मार्गावरून पाठविण्यात येत आहेत. त्या बाबत गणेशभक्त आणि नागरिक नाराजी व्यक्त करीत असून अशा प्रकारे अधिसूचनेचा भंग करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दिनांक ३१/०८/२०२५ (पाच दिवसांचा विसर्जन दिवस), दिनांक ०२/०९/२०२५ (गौरी गणपती व सात दिवसांचा विसर्जन दिवस) व दिनांक ०६/०९/२०२५ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत दुपारी १४.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील. सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका,अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मूर्ती विसर्जनातील वाहनांना लागू होणार नाही,असे नमूद केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त साहसी अजित कारभारी यांचा गौरव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे व्दारा राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त गुरुवारी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते साहसी हवाई क्रीडा क्षेत्रात अतुलनीय कामगिरी बद्दल ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील कोळीवली गावात राहणाऱ्या कुस्तीपटू कै बळीराम कारभारी यांचे सुपुत्र अजित कारभारी यांचा गौरव जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव, क्रीडा प्रशिक्षक समीर सूर्यवंशी व इतर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कर्मचारी यांची उपस्थिती होते.राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त राज्यातील नागरीक, युवक, युवतींना, खेळाडूंना साहसी हवाई क्रीडा प्रकाराचे महत्व व प्रचार प्रसार व्हावा, निरोगी राहण्यासाठी संदेश दिला. स्काय डायव्हिंग, पॅराजम्पिंग या साहसी क्रीडा प्रकारात सर्वांनी सहभाग घेऊन ठाणे जिल्ह्याचे नावलौकिक करावे असे अजित कारभारी यांनी आवाहन केले.

# भिवंडीत मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात मटका व जुगाराचे अड्डे मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याने नागरिकां मध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शालेय विद्यार्थीसह अनेक व्यापारी जुगार अड्ड्यावर रात्रीच्या वेळी दाखल होऊन या अवैध धंद्यावर लाखो रुपयांची उलाढाल करीत आहेत. पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणी चालणाऱ्या या बेकायदेशीर अड्ड्यावर कारवाई करण्याची मागणी अँड. नितीन तांबे यांनी केली असतानाच भिवंडी पोलिसांनी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे यांच्या आदेशानुसार पुर्णा गाव येथील एका मटका जुगार अड्या वर छापा कारवाई करीत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पूर्णा गावातील मराठी शाळे जवळील जागेत मटका जुगार सुरू होता याबाबत नारपोली पोलिसांना तक्रार जाताच त्यांनी सदर ठिकाणी केलेल्या कारवाईत १७६० रूपये रोख रक्कम व मटक्याचे एक पावती पुस्तक जप्त करीत मटका जुगार खेळवणाऱ्या प्रशांत हिना पाणीग्रही,किसन उमाशंकर पटेल,श्रीरंग काशिनाथ शिंदे या तिघांविरोधात नारपोली पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.शहरातील भोईवाडा परिसरात, टावरे कंपाऊंड, नारपोली देवजी नगर,भंडारी कंपाऊंड, अंजूरफाटा,अशोक नगर, शांतीनगर, नझराणा रोड, धामणकर नाका, ताडाळी, कामतघर अशा विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात जुगाराचे रात्रीच्या वेळी अड्डे राजरोसपणे सुरू असुन पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी अँड.आशुतोष शेलार व अँड. नितीन तांबे यांनी केली आहे. मटका व जुगार अड्डे चालवणाऱ्या मूळ मालकांना गुन्हे दाखल होणे आवश्यक आहे मात्र कामगार व गरीब लोकांवर गुन्हे दाखल होत आहेत त्यामुळे पोलिसांनी मटका व जुगार अड्ड्यावर धाड टाकल्यानंतर मूळ मालकाला शोधून गुन्हे दाखल करावे तरच या अवैध धंदयांना पायबंद लागेल अशी मागणी ऍड तांबे यांनी केली आहे.

# दुबईत सार्वजनिक गणेश उत्सव साजरा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सर्वांनी संघटित व्हावे यासाठी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरु केला. तेव्हापासुन फक्त महाराष्ट्रात नव्हे, हिंदुस्तानात नव्हे तर हिन्दुस्तानाबाहेर देखील सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होऊ लागला. यामध्ये दुबई देखील मागे नसून यंदा इंस्पायर इव्हेंटस आणि दुबईतील विविध सामाजिक संघटना, कंपन्या, सांस्कृतिक मंडळे व मित्रपरिवार यांनी दुबई येथे भव्य सार्वजनिक गणेश उत्सव साजरा करण्यात येत आहे. या गणेश उत्सवा दरम्यान भव्य असा बारा ज्योतिर्लिंग विषयक देखावा करण्यात आला आहे जो सर्व दुबईकरांचे आकर्षण बनला आहे. वेस्टझोन प्लाझा हॉटेल अपार्टमेंट्स, कुवैत स्ट्रीट, मनखुल दुबई येथे बुधवारी गणपती बाप्पाचा श्रीमंत ढोल ताशा पथकाच्या वादनाने आगमन सोहळा आणि प्राणप्रतिष्ठा झाली. त्यानंतर दिवसभरात भजन व सामूहिक गणेश जाप, दुपारची आरती, अथर्वशीर्ष पठण,सांस्कृतिक कार्यक्रम, संध्याकाळची आरती, गणेश भजन व जागरण हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

गुरुवारी गणेश पूजन आणि आरती, भजन व सामूहिक गणेश जाप व संध्याकाळी भव्य मिरवणूक, गणेश विसर्जन व सांगता आरती करण्यात आली. दुबईत दुसरे वर्ष असलेल्या गणेश उत्सवात हजारो भाविक एकत्र येऊन आपल्या गणरायाची सेवा करून एक वेगळा आदर्श संपूर्ण जागा समोर ठेवीत आहेत.

# भक्तीपूर्ण वातावरणात दीड दिवसांच्या गणपतींचे विसर्जन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण येथील वायले नगर, मुंबई विद्यापीठ परिसरात उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावात भाविकांनी साश्रू नयनांनी निरोप दिला. दिवसभर पावसाची संततधार असल्याने जणू वरुणराजाही बाप्पाला जड अंत:करणाने निरोप देत होता. येथील कृत्रिम तलावात परिसरातील लोकांनी गर्दी केली. येथील भक्तांची सोय पहाण्यासाठी प्रत्यक्ष कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी येथे भेट दिली. महानगरपालिकेने येथे विसर्जन तलाव उभारून परिसरातील भक्तांची मोठी सोय केली याबद्दल सर्वांनी आयुक्तांचे आभार मानले. आयुक्त अभिनव गोयल यांनीही येथील कार्यपद्धतीवर समाधान व्यक्त केले. तसेच त्यांनी सांगितले की सदर तलावातील मुर्ती ह्या नंतर एकत्र करुन त्या साई निर्वाणा येथे जमा केल्या जातील व नंतर शास्त्रोक्त पद्धतीने मुर्तीचे विसर्जन करण्यात येईल जेणेकरून नदी किंवा खाडी हे पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत प्रदूषित होणार नाहीत. अशाप्रकारे या तलावावर विसर्जन शिस्तबद्धरित्या होण्यासाठी कडोंमपाचे कर्मचारी व रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंड्स हे भक्तांना मार्गदर्शन करतांना दिसुन आले.

# पालघर नगर परिषदेसाठी नवा आराखडा जाहीर

■ १४ ऐवजी १५ विभाग, नगरसेवकांची संख्या ३० वर...
■ नव्या आरखड्यामुळे सीमांत बद्दल...




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठीचा नवा विभागीय आराखडा अखेर जाहीर झाला आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी नानासाहेब कामोठे यांनी निवडणूक आयोगाच्या परवानगीनंतर हा आराखडा प्रसिध्द केला. यापूर्वी नगर परिषदेत १४ विभाग होते आणि त्यातून २८ नगरसेवक निवडले जात होते. मात्र आता एका विभागाची वाढ झाल्याने नगर परिषदेत १५ विभाग झाले असून, ३० नगरसेवक निवडून येणार आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार पालघर नगर परिषदेची लोकसंख्या ६८ हजार ९३० इतकी नोंदवली होती. त्याच आधारे विभागीय आराखडा आखण्यात आला आहे. याआधी एका विभागातून दोन प्रतिनिधी निवडले जात होते, आता त्या संख्येत वाढ होऊन एकूण ३० प्रतिनिधी निवडले जाणार आहेत.नव्या आराखड्यामुळे अनेक विभागांच्या सीमांत बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यमान नगरसेवकांसह नव्या उमेदवारांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिक आणि राजकीय इच्छुकांकडून या आराखड्यावर आक्षेप नोंदविण्याची मुदत ठेवण्यात आली असून, ३१ ऑगस्टपर्यंत तक्रारी आणि सुचना सादर करता येणार आहेत.

# बेलवडे येथे बस थांब्याचे लोकार्पण

## खा. धैर्यशील पाटील, आ. रविशेठ पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : बेलवडे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते मोहन राम पाटील यांनी स्वखर्चाने बेलवडे ग्रामपंचायत हद्दीत बेलवडे खुर्द ( दवणसर ) आणि मुंगोशी या ठिकाणी नागरिकांच्या सोयीसाठी वडील स्व. रामशेठ पाटील आणि आई सीताबाई रामशेठ पाटील यांच्या स्मरणार्थ बस थांब्याचे लोकार्पण राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील आणि पेण विधानसभा मतदार संघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते मोहन पाटील आणि त्यांची पत्नी ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच भारती मोहन पाटील यांना समाजसेवेची आवड आहे. सामाजिक, धार्मिक आणि क्रीडा क्षेत्रात त्यांचे चांगले योगदान राहिले आहे. नागरिकांची होणारी गैर सोय ओळखून त्यांनी आपल्या स्वखर्चाने दोन ठिकाणी हे बस थांबा उभारलेले आहेत.

या उद्घाटन प्रसंगी राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील, पेणचे आमदार रविशेठ पाटील,हभप कृष्णाजी लांबे महाराज, माजी जिल्हा परिषद सदस्य डी बी पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती महादेव मानकर,माजी उपसभापती बाळाराम पाटील, भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष मंगेश भाई दळवी, सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे, कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र शिंदे,पोलिस पाटील किसन पाटील, मुंगोशी पोलिस पाटील विश्वनाथ बेकावडे,सरपंच हरेश पाटील, ग्रामपंचायत सदस्या प्रमिला मदन पाटील, अश्विनी केतन पाटील, शिल्पा विनोद गोळे, ग्रामस्थ वामन पाटील,मदन पाटील, सुदाम पाटील, लक्ष्मण पाटील, सुभाष पाटील, बाबुराव पाटील, विठ्ठल कचरे, गजानन ठाकूर, केशव ठोंबरे चंद्रकांत ठोंबरे, श्याम ठोंबरे, परेश ठोंबरे, अनंता पोपेटा , लक्ष्मण पाटील उमेश पाटील सदानंद पाटील, भगवान बेकावडे, चिंतामण पाटील, रुपेश पाटील, संदीप पाटील, राजू पाटील, भानुदास पाटील, प्रविण पाटील,केतन पाटील, भास्कर चव्हाण, अमित चव्हाण, केतन ज्ञानेश्वर पाटील, रवींद्र घरत, संतोष पाटील विनोद गोळे, राजू गोळे, मितेश गोळे, विठ्ठल पवार, चंद्रकांत पवार यावेळी उपस्थित होते.

# शिवनेरी विद्यालयाच्या पहलवानांचा तालुका स्तरावर डंका



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : ग्रामशिक्षण सेवा मंडळ, धोलवड संचलित शिवनेरी विद्यालयाने पुन्हा एकदा आपल्या नावाचा झेंडा तालुका स्तरावर उंचावला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे, जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना आणि समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जुन्नर तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन यांनी दिली.

ही स्पर्धा दि. २८ ऑगस्ट रोजी बेल्हे येथे आयोजित करण्यात आली होती. फ्री स्टाईल आणि ग्रीको-रोमन प्रकारातील १४, १७ आणि १९ वर्षाखालील मुला-मुलींच्या गटात दमदार कुस्ती सामने पार पडले.

शिवनेरी विद्यालयातून एकूण सहा स्पर्धकांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई करून विद्यालयाचा गौरव वाढवला.

विजेते विद्यार्थी

१७ वर्षाखालील सुवर्णपदक विजेता : कु. गौरव बबन काळे – प्रथम क्रमांक (७१ किलो गट),

१४ वर्षाखालील रजतपदक विजेता : कु. अथर्व सुभाष नलावडे – द्वितीय क्रमांक (६० किलो गट)

१४ वर्षाखालील कांस्यपदक विजेते :

१) कु. आयुष खंडू नलावडे – तृतीय क्रमांक (४५ किलो गट)

२) कु. अद्वित निलेश नलावडे – तृतीय क्रमांक (४५ किलो गट)

या विजयानंतर ग्रामशिक्षण सेवा मंडळाचे अध्यक्ष भालचंद्र नलावडे, मार्गदर्शक शिवाजीराव नलावडे तसेच सर्व संचालक मंडळाने विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या यशामागे विद्यालयाचे शिक्षक गोसावी आर.एस, वेडे बी.एच, शिवशरण एस.व्ही, उपशिक्षिका कर्पे एस.के, कानडे एस.पी, पानसरे एस.व्ही आणि तांबे मयुरी यांनी केलेल्या मार्गदर्शन व परिश्रमाचे मोठे योगदान आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या पुढाकारातून

# 'श्रीगणेशा आरोग्याचा'

## राज्यभरातील नागरिकांची होणार आरोग्य तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

**नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता :** शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

**गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृती :** नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा' या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# रायगड पोलीस दलात फॉरेन्सिक व्हॅन दाखल

## तपास यंत्रणेच बळ वाढणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/पेण : भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 लागू झाल्यानंतर पोलीस तपास प्रक्रियेत तांत्रिक अचूकता आणण्यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार रायगड जिल्हा पोलीस ताफ्यात अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन दाखल झाली असून, जिल्ह्यातील तपास यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची नवी ताकद मिळाली आहे. या अत्याधुनिक व्हॅनमध्ये भौतिक, रासायनिक, जैविक तसेच डिजिटल पुरावे गोळा करण्यासाठी लागणारी अत्याधुनिक साधनसामग्री (किट्स) बसविण्यात आली आहे. त्यासाठी विशेष प्रशिक्षित मनुष्यबळ नेमले असून, त्यात ४ असिस्टंट केमिकल अनालायझर, २ सायंटिफिक असिस्टंट आणि वाहन चालकाचा समावेश आहे. त्यामुळे ही व्हॅन गंभीर गुन्ह्यांच्या तपासात घटनास्थळीच ठोस व शास्त्रशुद्ध पुरावे गोळा करण्याचे काम करणार आहे. हे पुरावे न्यायालयात सादर करून आरोपींना शिक्षा होण्याची प्रक्रिया अधिक वेगवान व खात्रीशीर होईल. परिणामी, निर्दोषांना दिलासा तर गुन्हेगारांना शिक्षा असे न्यायाचे तत्त्व अधिक प्रभावीपणे लागू होईल. रायगड जिल्हा पोलीस स्थापित सुविधा उपलब्ध झाल्याने तपास प्रक्रियेत अचूकता वेग आणि पारदर्शकता वाढण्यास मदत होईल हे व्यायाम २४ तास कार्यरत होणार आहे या यांचे परीक्षण जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल तसेच अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी केले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024